आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार, दिनांक १६ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

- राज्य विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा, निवडणुकीला सामोरं जाण्यासाठी महाविकास आघाडी तयार.
- ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 'आट्टम' या मल्याळम चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार.
- अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील गरजू रुग्णांना घरपोच वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी आजपासून फिरते रुग्णालय कार्यान्वित.
- चंद्रपूर आणि यवतमाळमध्ये आज तर गडचिरोली जिल्ह्यात उद्या मुसळधार पावसाचा येलो अलर्ट; २० ऑगस्ट पर्यंत विदर्भात वादळी पर्जन्यमान.

****

महाविकास आघाडी मेळावा

राज्य विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेण्यात आला. निवडणुकीला सामोरं जाण्यासाठी महाविकास आघाडी तयार असून ही महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्याची लढाई असल्याचं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्याला संबोधित करताना केलं. शरद पवार आणि बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, माझा त्याला पाठिंबा आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. लोकसभेत यश आलं म्हणजे राज्यघटनेवरचं संकट टळलं, असं नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला, तर विधानसभा निवडणुकीत भाजप युतीचा पराभव करून महाराष्ट्राचा पैसा महाराष्ट्रातील जनतेसाठीच वापरू, अस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. भाजपाचा उद्देश राज्यघटना आणि लोकशाहीवर आघात करण्याचा आहे, हे लक्षात ठेवून कार्यकर्त्यांनी काम करावं, हे बेकायदा सरकार जनतेला उलथवून लावायचं आहे, असं प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी केलं.

दरम्यान, भंडारा गोंदियाचे भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार शिशुपाल पटले यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत आज काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे पुर्व विदर्भात काँग्रेस पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे अस काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाल.

अटलबिहारी वाजपेयी पुण्यतिथी

माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. नवी दिल्ली इथं 'सदैव अटल' या वाजपेयी यांच्या समाधी स्थळाजवळ प्रार्थना सभा घेण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातल्या सदस्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन केलं. अटलबिहारी वाजपेयीजी देशातील कोट्यावधी कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. एक कुशल संघटक, विचारधारा आणि तत्त्वांशी एकनिष्ठ अश्या अटलजींचे जीवन नेहमीच राष्ट्राला समर्पित होते. आज त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करत असल्याचा संदेश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी समजमध्यमावरुन दिला आहे. मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील एक्स समाजमाध्यमावर वाजपेयीयांना आदरांजली वाहिली आहे.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

आज जाहीर केलेल्या राष्ट्रीय चित्रपटांमध्ये ‘आट्टम’ या मल्याळम चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचापुरस्कार जाहीर झाला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आज या चित्रपटांची घोषणा केली. फीचर चित्रपट विभागात पोन्नियन सेल्वन भाग एकनं वर्चस्वगाजवलं. ‘तिरुचित्रमबलम’ या चित्रपटासाठी नित्या मेनन आणि ‘कच्छ एक्सप्रेस’या चित्रपटासाठी मानसी पारेख सर्वोत्कृष्ट नायिका ठरल्या. ‘कांतारा’ या कन्नड चित्रपटासाठी ऋषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्टअभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला. ‘ऊँचाई’ या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार जाहीरझाला. सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचा पुरस्कार पोन्नियन सेल्वनभाग १ या तमिळ चित्रपटासाठी ए. आर. रेहमानआणि ब्रह्मास्त्र- भाग १: शिवा या हिंदी चित्रपटासाठी प्रीतमयांना विभागून देण्यात आला. तर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा मान‘केसरिया’ या गाण्यासाठी अरिजीत सिंह यानं पटकावला. ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार ‘वाळवी’ या चित्रपटालाजाहीर झाला आहे. नॉन फीचर विभागात साहिल वैद्य दिग्दर्शित‘आदीगुंजन’ या मराठी माहितीपटानं सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा मान मिळवला. याच माहितीपटासाठी सुमंत

शिंदे यांनासर्वोत्कृष्ट व्हॉइस ओव्हरसाठी पुरस्कार जाहीर झाला. सर्वोत्कृष्टकला-संस्कृतीविषयक चित्रपटाचा मान सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' या मराठी चित्रपटानं पटकावला. तर 'आणखी एक मोहेंजोदारो' हा सर्वोत्कृष्ट चरित्र अथवा ऐतिहासिक चित्रपट ठरला.

निवडणूक चिन्ह

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं वंचित बहुजन आघाडी आणि प्रहार जनशक्ती पक्षाला निवडणूक चिन्ह दिलं आहे. वंचित चे सर्व उमेदवार गॅस सिलिंडर तर प्रहारचे उमेदवार बॅट या चिन्हावर निवडणूक लढवतील. जातीय सेना पक्षाला कोबी हे चिन्ह निवडणूक आयोगानं दिलंय.

आयएमए संप

कोलकाता इथं प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील लैंगिक अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनं उद्या एक दिवसाचा देशव्यापी संप जाहीर केला आहे. या काळात अत्यावश्यक सेवा सुरू राहणार असून बाह्य रुग्ण विभागाचं कामकाज मात्र बंद ठेवण्यात येणार आहे. या दुर्घटनेनंतर कोलकाता रुग्णालयात झालेल्या तोडफोडीचाही इंडियन मेडिकल असोसिएशनं निषेध केला आहे. दरम्यान, या दुर्घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या महिला विभागाच्या वतीनं आज कोलकत्यात मूक मेणबत्ती मोर्चा काढण्यात येणार आहे.

पद्म पुरस्कार नामांकनं

देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेल्या पद्म पुरस्कार २०२५ साठीची नामांकनं येत्या १५ सप्टेंबर पर्यंत स्वीकारली जाणार आहेत. इच्छुक व्यक्ती www.awards.gov.in या संकेत स्थळावर भेट देऊ शकतात.

फिरते मेडीकल क्लिनिक

फिरते रुग्णालयाच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यातील मेळघाटसह परिसरातील गरजू रुग्णांना घरपोच वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध होईल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितल. फिरते मेडिकल युनिट असलेली अँबुलन्स मेळघाटातील 25 गावात वैद्यकीय सेवा पुरविणार आहे. या फिरत्या रुग्णालयामध्ये सर्व प्रकारच्या वैद्यकीय, रक्त चाचण्या उपलब्ध आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झालेल्या फिरते रुग्णालय असलेल्या मोठ्या रुग्णवाहिकेचे पालकमंत्री  पाटील यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. चांदुरबाजार तालुक्यातील कुरळपूर्णा येथील आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था अधिनस्त निवासी मूकबधिर विद्यालयाला सदिच्छा भेट प्रसंगी आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री बोलत होते.

चंद्रकांत दादा पाटील

महाबळेश्वरच्या धर्तीवर अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा या निसर्गरम्य थंड हवेच्या ठिकाणाच पर्यटनाच्या दृष्टीन देशभरात नावलौकीक व्हावा  तसच या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या नवीनतम संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी  जिल्हा नियोजन योजना आणि सी.एस.आर. फंड मधून निधी उपलब्ध करुन देणार, असं आश्वासन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिलं आहे. चिखलदरा तालुक्यातील 'आमझरी निसर्ग पर्यटन संकुल' आणि  खटकाली येथील 'प्रकाश होम स्टे' ला पालकमंत्र्यांनी भेट देऊन साहसी खेळ चालविणाऱ्या युवक आणि युवतींशी रोजगार, कामकाज आणि  साहसी खेळ प्रशिक्षणाबाबत चर्चा केली. त्याप्रसंगी ते बोलत होते.

लाडकी बहिण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात झाली आहे. स्वातंत्र्यदिनाच औचित्य साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्यभर आपल्या लाडक्या बहिणींशी संवाद साधला. यवतमाळ जिल्ह्यातील 150 बहिणी या संवादात सहभागी झाल्या होत्या. काल यवतमाळ इथं  महिला बालकल्याण भवन येथील सभागृहात संवादाच थेट प्रसारण झाल. दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेअंतर्गत राज्यभरातल्या भगिनींच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याबद्दल आनंद वाटत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे, रक्षाबंधनापूर्वी भावान बहिणीला दिलेला हा माहेरचा आहेर असल्याचं  मुख्यमंत्री म्हणले. लाडक्या बहिणींना दिलेली ही मदत त्यांच्या मुलांच्या शालेय साहित्यासाठी, कुटुंबीयांच्या औषधांसाठी, तसंच महिलांच्या सुरु असेलेला छोटा-मोठा व्यवसाय वाढवण्यासाठी महत्त्वाची ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

प्राथमिक बैठक

नामवंत राष्ट्रीय संशोधन संस्था आणि नागपूर इथल्या नामवंत शैक्षणिक संस्थांच्या सहकार्यानं संशोधनाचे नवनवीन मार्ग शोधले जाणार आहेत. याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोला ॅजी आणि जेनेटिक इंजिनिअरिंग विभागात साहचर्य बैठक नुकतीच पार पडली. नागपूर शहरातील **AIMS, CSIR** -निरी, **ICAR - CCRI, ICAR - CICR , MGIMS** वर्धा, **SAI** बायोसिस्टम्स, **PGNIPM, SDKS** डेंटल कॉलेज नागपूर आणि बुटीबोरी **MIDC** येथील केमिकल इंडस्ट्री आदी नामवंत संस्थांसोबत शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात नवीन मार्ग शोधणे हा या बैठकीचा उद्देश आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण

भंडारा जिल्हा प्रशासन आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता केंद्र भंडारा यांच्या संयुक्त विद्यमान मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत रोजगार महामेळाव्याच आयोजन जिल्हा परीषद भंडारा इथल्या सभागृहात आयोजित करण्यात आलं. या माध्यमातुन जिल्ह्यातील विविध ठिकाणीं 910 पदाकरीता पद भर्ती होणार आहे. याद्वारे 12 वी शिक्षण घेणाऱ्यांना 6 हजार, डिप्लोमा कोर्ससाठी 8 हजार आणि डिग्री घेतलेल्या विद्यार्थ्यांना 10 हजार रूपये मानधन देण्यात येणार आहे. याचा कालावधी 6 महिन्या करीता असणार आहे. आज या रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील हजारो बेरोजगार तरुणांनी हजेरी लावली.

हवामान

विदर्भात सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला असून यवतमाळ आणि चंद्रपूर मध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उद्या देखील सर्वत्र वादळी पर्जन्यमान राहणार असून गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडू शकतो असा अंदाज हवामान खात्यान व्यक्त केला आहे. दरम्यान गेल्या 24 तासात चंद्रपूर येथे सर्वाधिक 35 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. तर गेल्या 24 तासात भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक 40 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्या पाठोपाठ नागपूर जिल्ह्यातील कुही इथं 39 पूर्णांक 8 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. येत्या 20 ऑगस्ट पर्यंत विदर्भात कमी अधिक प्रमाणात पाऊस राहणार असून सतर्कतेचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तत्पूर्वी, आज सकाळी नागपुरात अल्प काळासाठी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडला. येत्या काही तासात विदर्भातील नागपूर यवतमाळ, अकोला, भंडारा, अमरावती चंद्रपूर, वर्धा आणि

गडचिरोली जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*****